उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिक्षकीय उद्योग अधिकारी (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमित / विनंती बदल्या.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्रमांक :- बदली-२०१९/३४०/प्र.क्र.५४/उद्योग-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ जुलै, २०१९

वाचा :- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५
२) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/आस्था-१/रापअ/वर्ग-१/सर्व बदली/२०१९/१३९, दि.२७.०५.२०१९, दि.२८.०५.२०१९ व दि.१२.०६.२०१९
३) नागरी सेवा मंडळ क्र.१ च्या दिनांक १२.०६.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

शासन आदेश :-

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिक्षकीय उद्योग अधिकारी (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांची संदर्भ क्र.१ चा अधिनियम व सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील प्रकरण दोन मधील कलम ४ (५) नुसार कलम ६ मध्ये नमूद केलेल्या लगतपूर्व बदली करणाऱ्या लगत वरीष्ठांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे बदली करण्यात येत आहे. :

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व कार्यरत ठिकाण	बदलीनंतरची पदस्थापना	शेरा
१.	श्री.का.ग.डेकाटे, महाव्यवस्थापक, जि.उ.कें., पुणे	महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद	रिक्त पदावर
२.	श्री.पी.डी.रेदांळकर, महाव्यवस्थापक, जि.उ.कें., नाशिक	महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे	श्री.डेकाटे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर
३.	श्री.एस.ए.भामरे, महाव्यवस्थापक, जि.उ.कें., पालघर	महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक	श्री रेदांळकर, यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

२. बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक अंतिम वेतन प्रमाणपत्र तात्काळ नवीन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत संबधितांना सूचना देण्यात याव्यात. तसेच अ.क्र. २ व ३ येथील अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीनुसार त्याची बदली करण्यात आली असल्याने त्यांना पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व तद्नुषंगीक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

३. संबंधित अधिकाऱ्याची शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम ३० सी नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याने रजेचा अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नसल्याच्या सूचना देण्यात याव्यात.

४. संबंधीत अधिकारी यांनी बदलीच्या पदावर हजर न होता लोकप्रतिनिधीमार्फत बदली रद्द करणे किंवा अन्यत्र बदली मिळणेबाबत शासनावर दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम,१९७९ मधील तरतुदीनुसार ते शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१५०३२६८०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Namdeo Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2019.07.22 17:50:22 +05'30'

(डॉ. ना. कों. भोसले)
शासनाचे उप सचिव

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,
३. मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव,
५. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / नाशिक / औरंगाबाद / पालघर
९. उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय, औरंगाबाद / पुणे / नाशिक
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे / नाशिक / औरंगाबाद / पालघर
११. संबंधित अधिकारी (उद्योग संचालनालयामार्फत)
१२. निवडनस्ती (उद्योग-३).